# नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड.

## (दरपत्रक सुचना-तिसरी वेळ)

### जा.क्रं.नांवाशमनपा/पापुवि/१७७६८/२०२६, दिनांक :- ०९.०२.२०२६

आयुक्त,नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड पाणी पुरवठा व्यवस्था अंतर्गत पाणी शुध्दिकरणासाठी व निर्जंतुकीकरण करणेसाठी औषधी (रसायणे) च्या वार्षिक पुरवठयासाठी खालील दिलेल्या तपशिलवार स्वत:उत्पादक अथवा त्याचे अधिकृत वितरक यांचेकडुन विहीत `ड` नमुन्यात निविदा मागविण्यात येत आहेत.

या निविदा फक्त नोंदणीकृत ठेकेदारांना महाराष्ट्र शासनाच्या इ टेंडर वेबसाईट http://mahatenders.gov.in वरुन खरेदी करता येतील. निविदेच्या अटी व शर्ती वरील वेबसाईटवर नमुद असतील.निविदा फक्त इंटरनेटवरुन खरेदी करता येतील व Online भरता येतील. ( याबाबत आयुक्त, म. न. पा. नांदेड यांचा निर्णय अंतिम असेल) नियम व अटी कार्यकारी अभियंता,पाणी पुरवठा विभाग यांचे कार्यालयात व महानगरपालिकेच्या नोटीस बोर्डावर पहावयास मिळतील.

**ई-निविदा प्रक्रियेचे वेळा पत्रक**

| अ.क्रं. | तपशील | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १ | ई निविदा प्रकाशीत करणे | १०.०२.२०२६ | ३.०० |
| २ | ई निविदा डाऊनलोड करणे | १०.०२.२०२६ | ३.०० |
| ३ | ई निविदा भरणे | १०.०२.२०२६ | ३.०० |
| ४ | ई निविदा भरण्याचा अंतिम दिनांक व वेळ | १६.०२.२०२६ | ३.०० |
| ५ | ई निविदा ऊघडणे | १७.०२.२०२६ | ३.०० |

| अ. क्र. | कामाचे नांव | पुरवठ्याचे अंदाजे परिमाण | इसाराची रक्कम ३% | कामाची मुदत | कोऱ्या निविदेची किंमत |
|---|---|---|---|---|---|
| १ | महापालिकेच्या सर्व जलशुध्दीकरण केंद्रावर आय.एस.आय. सुधारीत मानकानुसार विरंजक चुर्ण T.C.L. (Bleaching Powder Grade-१) चा २५ कि.ग्रॅ.पॅकिंग मध्ये पुरवठा करणे बाबत. (दुसरी वेळ) | १५० मे. टन | १,४३,३७०/- | १२ महिणे | १६,०००/- |

**नोट :- दर वाहतुक व करासहीत असावे.**

## लिफाफा क्र. १

**(अ) लिफाफा क्र. १ साठी खालील कागदपत्रांच्या Scanned प्रति Online भरणे बंधनकारक राहील.**

१. इ-टेंडर खरेदी केल्याची रोख पावती किंवा डिमांड ड्राफ्ट.
२. इसारा रक्कमेचा आयुक्त, नांवाशमनपा यांच्या नावाने राष्ट्रीयकृत बँकेचा डिमांड ड्राफ्ट.
३. निविदाकार (Tenderer) च्या बाबतीत
   (अ) स्वत: निर्माता असल्यास डि.आय.सी.रजिस्ट्रेशन.
   (ब) विक्रेता / पुरवठादार असल्यास संस्था / दुकान नोंदणी प्रमाणपत्र / अधिकृत विक्रेता असल्यास संबंधित निर्मात्याचे प्रमाणपत्र.
४. GST रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र.
५. मागील ०३ वर्षाचे (२०२२-२३, २०२३-२४, २०२४-२५) चे Income Tax Return.
६. अनूभव प्रमाणपत्र : खालील संस्था/खाते यांना ब्लिचिंग पावडर समाधानकारक पुरवठा केल्याचे कार्यकारी अभियंता अथवा तत्सम हूद्दयावरील अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र : म.न.पा. /म.जी.प्रा./ म.औ.वि. महामंडळ/नगरपालिका/कटक मंडळे
७. निविदाकार ज्या निर्मात्याचे (मेकचे) ब्लिचिंग पावडर पुरवठा करणार आहे त्या मेक च्या ब्लिचिंगचे निविदा दिनांका पूर्वी ३ महिन्याच्या आतील रासायनीक परिक्षण अहवाल.
८. निविदा धारकाने कोरी निविदेची किंमत (Tender Fee) व ईसारा रक्कम (EMD) ची रक्कम Online Payment Gateway व्दारे भरणा करावी.
९. विक्रेता /पुरवठादार यांनी मागील ५ वर्षापैकी कोणत्याही ०३ वर्षात निविदेतील परिमाणाच्या ५०% प्रति वर्ष या प्रमाणे समाधानकारक ब्लिचिंग पावडर पुरवठा केल्याचे मनपा/मजीप्रा/म.रा.औ.वि.महामंडळ/नगरपालिका/कटक मंडळे येथील कार्यकारी अभियंता अथवा तत्सम हुद्यावरील अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.
१०. विक्रेता / पुरवठादार यांनी मागील आर्थिक वर्षातील वार्षीक उलाढाल ५५ लक्ष रुपयांपेक्षा कमी नसल्याबाबत सनदी लेखापालाचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.
११. ब्लिचिंग पुरवठादाराकडे ज्या उत्पादकाकडून ब्लिचिंग पुरवठा करण्यात येणार आहे त्या उत्पादकाकडे BIS (Bureau of Indian Standards ) प्रमाणित असलेले प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

१२. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम १०(फ) नुसार महापालिका पदाधिकाऱ्यांचे निविदा संदर्भात प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष संबंध नसल्याचे प्रमणपत्र निविदाधाकरांना लेटर हेडवर सादर करणे आवश्यक आहे.

१३. कंत्राटदाराने सर्व कागदपत्रे खरी असल्या बाबतचे प्रतिज्ञापत्र १००/- स्टॅम्प पेपरवर प्रत्येक निविदेसाठी स्वतंत्र कामाचे नांव टाकून जोडणे बंधनकारक आहे. लिफाफा क्रं.१ मध्ये तसेच निविदा मंजुरी व नंतर देयके अदा करतांना जोडलेली कागदपत्रे खोटी व बनावट असल्याची बाब निदर्शनास आल्यास कंत्राटदार पुर्णपणे जबाबदार राहतील. मनपाची कोणताही अधिकारी जबाबदार असणार नाही.

१४. निविदा धारकाला काळ्या यादीत टाकले नसल्या बाबत स्वयंघोषणापत्र.

(ब) लिफाफा क्रं.०२ दराचा लिफाफा यात निविदाधारकाचे निविदेतील अटी व शर्ती नुसार प्रति मेट्रीक टन ब्लीचिंग पावडर पुरवठा करीताचे सर्व करांसह दर नमुद करावे.

## इतर अटी व शर्ती

१. निविदाकाराने भरावयाचे दर सर्व करासहित व खालील ठिकाणी पोंच सह असावेत. निविदा कालावधीत कर/भाववाढ झाल्यास म.न.पा. कोणतीही वाढ देण्यास बंधनकारक नसणार. **जलशुध्दीकरण केंद्रे : काबरानगर, डंकीन, सिडको, असदवन**

२. अट असलेली (Conditional) निविदा उघडण्यात येणार नाही.

३. निविदेतील परिमाण अंदाजीत आहेत. तो कमी अथवा जास्त होऊ शकतो. व त्यासाठी वेगळा दर असणार नाही.

४. निविदाकाराने भरलेले दर (देकार) व्यापारी लिफाफा उघडल्यापासून ९० दिवसापर्यंत ग्राहय असतील.

५. रसायनांच्या आवश्यकते नूसार मंजूर झालेल्या निविदाकारा सोबतच ईतराकडून रसायन घेण्याचा म.न.पा.स अधिकार राहील. तसेच दोन निविदाधारकांचे दर मान्य करण्यात येईल. L1 निविदाधारक वेळेत माल पुरवठा न केल्यास निविदा अटी व शर्तीनूसार कार्यवाहीस पात्र ठरेल.

६. निविदा मंजूर झालेल्या निविदाकाराने प्रथम दहा लाखासाठी रु.५००/- स्टॅप पेपर व पुढील रक्कमेस प्रत्येकी एका लाखास रु.१००/- याप्रमाणे मुंद्राक शुल्क भरुन म.न.पा.शी करारनामा लेखी कळविल्यानंतर ७ दिवसात करावा लागेल.करारनाम्या सोबत लिफाफा क्र.१ मधील नमुद मेकच्या ब्लिचिंग पावडर पुरवठ्याची निविदा उघडण्यापूर्वीच्या १ महिन्याच्या आतील रासायनीक परिक्षण अहवाल सादर करणे बंधनकारक आहे. तसेच पुरवठादारास पुरवठा केल्यानंतर नियमानूसार व उपलब्ध निधीनूसार देयके अदा करण्यात येतील. देयक न मिळाल्याच्या सबबीवर पुरवठा लांबविल्यास अथवा थांबविल्यास त्याची दखल जीवनावश्यक बाबींच्या कलमाखाली घेवून पुरवठादार कार्यवाहीस पात्र ठरेल.

७. ब्लीचिंग पुरवठयाच्या प्रत्येक प्लॉट मधील नमुन्यांची तपासणी शासकिय जिल्हा आरोग्य प्रयोग शाळेत पुरवठा धारका मार्फत करण्यात येईल. ठरवून दिलेल्या मानकानूसार अहवाल नसल्याचे आढळल्यास तो लॉट पुरवठाधारकाने स्वखर्चाने परत नेणे बंधनकारक राहील.

८. लिफाफा क्र.१ मधील नमुद मुळ रोखपावती/ मुळ डिमांड ड्राफ्ट व्यापारी लिफाफा उघडण्याचे वेळी कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयात जमा करावा लागेल. तसेच Online भरलेल्या Scanned प्रतीच्या मुळ साक्षांकित प्रती त्यावेळी सोबत आणणे आवश्यक आहे.

९. महाराष्ट्र शासन उद्योग व उर्जा विभागाच्या प्रचलित शासन धोरणानुसार ३% सुरक्षा अनामत रक्कम कार्यारंभ आदेश निर्गमीत करण्यापूर्वी सादर करावी लागेल.

१०. कोणतीही किंवा सर्व निविदा कोणतीही कारण न देता नाकारण्याचा अधिकार आयुक्त,नांवाशमनपा यांनी राखुन ठेवला आहे.

११. कोणताही वाद अथवा तंटा उद्भवल्यास आयुक्त,म.न.पा.नांदेड यांचा निर्णय अंतिम राहील.

स्वाक्षरीत/-
अतिरिक्त आयुक्त,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड

**प्रतिलिपी :-**

१. संपादक,१) दै.पुढारी (राज्य) २) दै.लोकपत्र यांना देऊन विनंती करण्यात येते की, सदरील निविदा सुचना आपल्या अंकात दि.१०.०२.२०२६ रोजीच्या दैनिकात कमीत कमी स्तंभ वापरुन ०८X१२ चौ.से.मी. मध्ये शासकिय दराप्रमाणे प्रसिध्द करुन अंकात तीन प्रति व बिलाच्या दोन प्रतिसह कार्यालयात शासनमान्य दराची प्रत जोडून सादर करावे.

२. नोटीस बोर्ड, मुख्य कार्यालय, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड.

३. सिस्टीम मॅनेजर, ई-टेंडरींग, संगणक विभाग, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

अतिरिक्त आयुक्त,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड
करीता/-

# नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड.

## (दरपत्रक सुचना-तिसरी वेळ)

दुरध्वनी:- ०२४६२- २३४४०४
ई-मेल पत्ता:- info@nwcmc.gov.in

पत्ता:- वजिराबाद, नांदेड
फॅक्स क्र. ०२४६२-२३२०७१

ई- निविदा सुचना क्र.नांवाशमनपा/पापुवजनि/**१७७६८**/२०२६, दिनांक :- ०९.०२.२०२६ सन - २०२५-२६

आयुक्त नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड पाणी पुरवठा व्यवस्था अंतर्गत पाणी शुध्दिकरणासाठी व निर्जंतुकीकरण करणेसाठी औषधी (रसायणे) च्या वार्षिक पुरवठयासाठी खालील दिलेल्या तपशिलवार स्वत: उत्पादक अथवा त्याचे अधिकृत वितरक यांचेकडुन विहीत `ड` नमुन्यात ई-निवीदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निवीदा मागवित आहोत. निविदा कागदपत्र संकेतस्थळावर https:/mahatenders.gov.in येथून डावूनलोड करण्यात यावी. तसेच निवीदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

कामाचे नाव:- **महापालिकेच्या सर्व जलशुध्दीकरण केंद्रावर आय.एस.आय.सुधारीत मानकानुसार विरंजक चुर्ण** T.C.L.(Bleaching Powder Grade-१) **चा २५ कि.ग्रॅ.पॅकिंग मध्ये पुरवठा करणे बाबत.**

(एकुण ०१ कामे) :- अंदाजित **रु.४७,७९,०००/-**

ई निवीदा उपलब्ध कालावधी:- **१०.०२.२०२६** ते **१६.०२.२०२६.**

ई निवीदा उघडणे :- **१७.०२.२०२६.**

स्वाक्षरीत/-
अतिरिक्त आयुक्त,
**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड**

खालील संकेतस्थळावर ई-निविदेची सर्व माहिती उपलब्ध आहे.

१. https:/mahatenders.gov.in
(सर्व निवीदासूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)
२. **संपादक, १) दै.पुढारी (राज्य) २) दै.लोकपत्र** यांना देऊन विनंती करण्यात येते की, सदरील निविदा सुचना आपल्या अंकात **दि.१०.०२.२०२६** रोजीच्या दैनिकात कमीत कमी स्तंभ वापरुन ०८X१२ चौ.से.मी.मध्ये शासकिय दराप्रमाणे प्रसिध्द करुन अंकात तीन प्रति व बिलाच्या दोन प्रतिसह कार्यालयात शासनमान्य दराची प्रत जोडून सादर करावे.
३. नोटीस बोर्ड, मुख्य कार्यालय, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड.
४. सिस्टीम मॅनेजर, ई-टेंडरींग,संगणक विभाग,नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

अतिरिक्त आयुक्त,
**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड**
**करीता/-**